साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490


उस्ताद जाकीर हुसेन यांच्यासोबत जुन्या आठवणी

सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2022-2024

* वर्ष २५ वे * अंक ५२ * सोमवार २३/१२/२०२४ * डाक २५/१२/२०२४ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 52 * monday : 23 / 12 / 2024 * post Dt. 25/ 12 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.

# कौटुंबिक कारणांमुळे मद्याची सवय जडलेल्या तीन युवकांवर यशस्वी उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मानसोपचार तज्ञांचे अथक प्रयत्न

**जळगाव – कौटुंबिक कारणांमुळे मद्याची सवय जडलेल्या तीन युवकांवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मानसोपचार तज्ञांकडून करण्यात आलेले उपचार यशस्वी ठरले असून हे तिही युवक आता व्यसनमुक्त झाले आहेत.**

याबाबत माहिती अशी की, संकेत नामक ३५ वर्षीय हा युवक बँकेत लिपीक म्हणून काम करीत होता. युवकाचे एका युवतीवर प्रेम जडले होते. दोघांनी लग्नाच्या आणाभाकाही घेतल्या होत्या. परंतु अचानक युवकाने प्रियसीसोबत विवाह न करता दुसऱ्याच युवतीशी सोबत संसार थाटला. अशा परिस्थितीत प्रियसीने त्याच्यावर गुन्हा दाखल केला. एकीकडे प्रियसी आणि दुसरीकडे पत्नी अशा जिकरीच्या अवस्थेत त्याला मद्य पिण्याची सवय लागली. ही सवय प्रचंड प्रमाणात वाढली. अक्षरश: उधारीने पैसे घेऊ तो मद्य पित असे. अशावेळी त्याला डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या मानसोपचार विभागाच्या संकल्प व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करण्यात आले. याठिकाणी संकेतचे समुपदेशन आणि औषधोपचार करण्यात आले. त्यामुळे संकेतच्या प्रकृतीत सुधारणा होऊन तो व्यसनमुक्तीकडे मार्गस्थ झाला. दुसऱ्या घटनेत २४ वर्षीय अक्षय नामक युवक हा एका


रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

युवतीच्या प्रेमात पडला होता. दोघांचेही दोन वर्ष प्रेमसंबंध होते. दोघांनी आयुष्यभर सोबत राहण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र युवतीचे दुसऱ्या मुलासोबत लग्न झाल्याने अक्षय हा मद्याच्या आहारी गेला. तसेच त्याला वारंवार आत्महत्येचे विचार येत होते. अक्षयच्या भावाने त्याला डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या मानसोपचार विभागातील संकल्प व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी भरती केले. याठिकाणी अक्षयवर औषधोपचारासह इलेक्ट्रो कव्हलसिव्ह थेरेपी अर्थात ईसीटीद्वारे त्याच्यावर उपचार करण्यात आले. या उपचारामुळे त्याच्या मनातील वाईट विचार दूर होऊन तो व्यसनमुक्त झाला. कौटुंबिक कारणामुळे अत्यंत सुशिक्षीत असलेला गौरव नामक तरूण व्यसनाच्या आहारी गेला होता. त्याला रोज मद्य पिण्याची सवय जडली होती. अशा परिस्थितीत त्याला संकल्प व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी त्याचे योग्य ते समुपदेशन करण्यात आले आणि औषधोपचारही करण्यात आले. त्यामुळे गौरव हा व्यसनाच्या गर्तेतून बाहेर आला आणि आनंदी आयुष्य जगू लागला.

**यांनी केले यशस्वी उपचार**

मद्याच्या सवयीपासून व्यसनमुक्तीकडे वाटचाल करणाऱ्या या तिन्ही युवकांवर मानसोपचार तज्ञ डॉ. विलास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आदित्य जैन, डॉ. सौरभ भुतांगे, डॉ. उमा चांदूरकर, डॉ. हिमांशू जाधव यांनी यशस्वी उपचार केले.

# डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात एन्डोस्कोपीद्वारे अल्सरचे निदान

**जळगाव – आम्लता जास्त झाल्याने किंवा जठराची आम्ल सहन करण्याची शक्ती कमी झाल्याने हळूहळू जठरव्रण तयार होतो. अल्सर किंवा जठरव्रण हे मध्यमवयात बऱ्याच लोकांमध्ये आढळणारे दुखणे आहे. या आजाराचे निदान करण्यासाठी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात अल्पदरात एन्डोस्कोपी तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

सतत काळजी,ताण, गडबड, जेवणातील अनियमितता, तिखट,तेलकट आहार यांच्यामुळे आम्लता वाढून अल्सर होण्याची शक्यता असते. पुरुषांमध्ये याचे प्रमाण जास्त असते. जेवणानंतर हे दुखणे वाढते किंवा कमी होते. तसेच तेलकट, तिखट खाल्ल्याने ते वाढते असे रुग्णाच्या लक्षात आल्यावर त्याच्या जेवणात आपोआप बदल घडून येतो. व्रणातून काही वेळा अचानक रक्तस्राव चालू होतो. अशा वेळी रक्ताची किंवा लालसर रक्तमिश्रित उलटी होते. पचनमार्गात बारीक रक्तस्राव कायम चालू राहिल्यास विष्ठेचा रंग काळसर दिसतो. क्वचित जठरव्रणाच्या जागी भोक पडून जठरातले पदार्थ, आम्ल पोटात (उदरपोकळीत) सगळीकडे पसरतात. यामुळे एकदम गंभीर परिस्थिती (उदरसूज) निर्माण होते.

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात अल्पदरात एंडोस्कोपीने तपासणी करून या आजाराचे निदान करता येते. तरी गरजू रूग्णांनी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात थेट संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# डोक्याला दुखापत झालेल्या दोन बालकांचे वाचले प्राण

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ञांचे यश

**जळगाव – खेळतांना पडल्याने ११ वर्षीय बालकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याच्यावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ञांनी शस्त्रक्रिया न करता त्याच्यावर करण्यात आलेले औषधोपचार यशस्वी ठरल्याने त्याचा जीव वाचला. तसेच जिन्यावरून पडलेल्या बालिकेवरही औषधपचार यशस्वी ठरल्याने तीची प्रकृती ठणठणीत झाली.**

याबाबत माहिती अशी की, शिरीष महाजन (रा. नशिराबाद) हा ११ वर्षीय बालक खेळत असतांना जमिनीवर पडला. पडल्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या बालरोग विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

याठिकाणी बालरोग तज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांनी त्याची तपासणी केली. तसेच त्याचा डोक्याचा सीटी स्कॅनही करण्यात आला. सीटी स्कॅनच्या अहवालात त्याच्या मेंदूत रक्तस्राव होऊन मार बसल्याचे निदान करण्यात आले. निदानानंतर त्याच्यावर औषधोपचार करण्यात आले. या औषधोपचाराला सकारात्मक प्रतिसाद मिळून शिरीष हा बालक पूर्णत: बरा झाला. तसेच दुसऱ्या घटनेत जळगाव जामोद येथील तेजल कंडरकार ही पाच वर्षीय बालिका जिन्यावरून पडली होती. तिच्या डोक्याला जबर मार लागल्याने दुखापत झाली होती. तिला तातडीने डॉ.उल्हास पाटील रूग्णालयाच्या बालरोग विभागात दाखल करण्यात आले.

याठिकाणी डॉ. उमाकांत अणेकर यांनी बालिकेची तपासणी केली. तसेच तिच्या मेंदूत पाणी झाले होते. त्यामुळे तिच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. या उपचारामुळे दोन्ही बालक ठणठणीत झाले. उपचारासाठी डॉ. चंद्राणी देगूलरकर, डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे यांनी सहकार्य केले.

# हृदयविकाराच्या झटक्यादरम्यानच तातडीची यशस्वी एन्जीओप्लास्टी

**जळगाव – ४५ वर्षीय रूग्णावर हृदयविकाराच्या झटक्यावेळीच तातडीने एन्जीओप्लास्टी केल्याने त्याचे प्राण वाचले. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयालयातील हृदयविकार तज्ञांच्या समयसूचकतेमुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.**

याबाबत माहिती अशी की, चोपडा तालुक्यातील वर्डी येथील बापूराव धनगर यांच्या छातीत अचानक दुखत होते. त्रास वाढून ते घरातच कोसळले. त्यांना तातडीने स्थानिक ठिकाणी दाखवले असता जळगाव येथे हलविण्याचा सल्ला देण्यात आला. धनगर यांच्या कुटूंबियांनी वेळ न दवडता डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी हृदयविकार तज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. हार्दिक मोरे यांनी त्यांची तपासणी केली. बेशुध्दावस्थेत असलेल्या बापूराव यांना तीन ईलेक्ट्रीक शॉक देण्यात आले. या दरम्यानच बापूराव यांना हृदयविकाराचा झटका आला. डॉ. वैभव पाटील आणि डॉ.हार्दिक मोरे यांनी रूग्णाची परीस्थिती लक्षात घेता तातडीने एन्जीओग्राफी केली. यात उजव्या बाजूची धमनी १०० टक्के बंद



होती. त्यामुळे त्यांच्यावर तत्काळ एन्जीओप्लास्टी करून बंद असलेली धमनी पुर्ववत करण्यात आली. डॉ. वैभव पाटील आणि डॉ. हार्दिक मोर यांच्या अनुभव कौशल्य आणि समयसूचकतेमुळे शस्त्रक्रिया यशस्वी ठरली आणि धनगर यांचे प्राण वाचले. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. मोहीत वाघ, डॉ. तेजस खैरनार, भूलशास्त्र तज्ञ डॉ. आकांक्षा पाटील, शस्त्रक्रिया विभागातील स्टाफ, रत्नशेखर जैन यांचे सहकार्य लाभले.

## संपादकीय

# तिचा पुढाकार स्वागतार्ह

समाजात मानसिक विकृती वाढत आहे. मुली आणि महिलांवर अत्याचाराची रोज एक घटना तरी उघडकीस येते. गुन्हेगारांना वयाची मर्यादादेखील कळेनाशी झाली आहे. अजाण बालिकेपासून वयोवृद्ध महिला त्याला बळी पडताना आढळतात. त्यादृष्टीने सामाजिक सुरक्षित वातावरण आणि गुन्हेगारांना जबर धाकनिर्मिती ही निःसंशय सरकारचीच जबाबदारी आहे. सरकार ती पार पाडण्यात यशस्वी होते आहे असे म्हणायचे धाडस जाणतेदेखील करणार नाहीत अशीच सद्यस्थिती आहे. परिणामी मुली आणि महिलांनी स्वतःला सक्षम बनवणे अपरिहार्य आहे. ही गरज नाशिक जिल्ह्यात सटाणा तालुक्यातील भाक्षी या गावातील एका विद्यार्थिनीला जाणवली असावी. परिस्थिती बदलण्यासाठी तिने तिच्या परीने पुढाकार घेतला. तिने महिला सुरक्षा ॲप बनवले आहे. हे ॲप इतर सुरक्षा ॲपसारखेच काम करते, असे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. कोणतेही सुरक्षा ॲप कसे काम करते हे निदान मुलींना सांगण्याची तरी आवश्यकता नसावी. हे ॲप प्रायोगिक असू शकेल. याबाबत तिला अधिक मार्गदर्शनाची गरजदेखील असू शकेल. तथापि तिला महिलांवरील संकटांची जाणीव झाली आणि त्यात सुधारणा करण्यासाठी पुढाकार घ्यावासा वाटला हे जास्त महत्त्वाचे आहे. लोकसहभागाने कोणत्याही सामाजिक समस्येवर उत्तर शोधले जाऊ शकते, हेच तिने तिच्या कृतीतून अधोरेखित केले. महिलांवरही अत्याचाराची एखादी घटना घडली की समाजात खळबळ माजते. लोक रस्त्यावर उतरतात. अनेक सामाजिक संस्था मुलींना सक्षम बनवण्यासाठी वर्ग चालवतात. तथापि ते वर्ग निरंतर सुरू राहिल्याचे क्वचितच आढळते. एखादे काम सातत्याने सुरू ठेवण्यातील सामाजिक संस्थांची मर्यादाही लक्षात घेण्यासारखी असू शकेल. अशा वर्गांच्या माध्यमातून स्वसक्षमतेची जाणीव महिलांना होणे आवश्यक असते. ती झाली की त्यांना स्वसंरक्षणाचे तंत्र शिकवणारे अनेक मार्ग सापडू शकतील. ते तंत्र कुठे आणि कसे वापरायचे याचा विवेकही स्वप्रयत्नातून त्यांच्यामध्ये रुजू शकेल. कारण तंत्राइतकाच तोही महत्त्वाचा आहे. सध्याही असे अनेक सुरक्षा ॲप कार्यरत असू शकतील. पोलिसांचेही असेच एक ॲप आहे. संकट आल्यास पीडिता संपर्क साधू शकतील असे अनेक क्रमांकदेखील पोलीस विभाग सातत्याने जाहीर करतो. त्याबाबतीत किती मुली सजग असतात? त्यांच्या मोबाईलमध्ये सुरक्षा ॲप डाऊनलोड असतात? पोलिसांनी दिलेले नंबर त्यांनी नोंदवलेले असतात? याही पातळीवर जाणीव जागृतीची गरज भासते. येनकेन प्रकारे अनावस्था प्रसंगांचा धैर्याने सामना करण्याची क्षमता मुलींमध्ये असण्याला पर्याय नाही हे मात्र नक्की खरे.

# धार्मिक कार्यक्रमांमध्ये डॉ. केतकीताईंचा सहभाग





### श्रीपाद वल्लभ दिगंबरा । दिगंबरा-दिगंबरा

**सावदा – दत्त जयंती निमित्त सावदा येथे शोभायात्रा काढण्यात आली.**

महानुभाव पंथाचे सुरेशराज मानेकर बाबा यांच्यासह पंथातील साधक तसेच भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. केतकीताई पाटील,आमदार अमोल दादा जावळे, बेटी बचाव च्या सारिका ताई चौहान यांच्यासह भाविक उपस्थित होते.डॉ केतकीताई यांनी शोभा यात्रेत सहभागी होऊन विविध वेशभूषा साकारलेल्या लहान मुलांचे कौतुक केले. सर्वांना दत्त जयंती च्या शुभेच्छा दिल्यात. दत्त नामाचा जयघोष यावेळी भाविक करीत होते.

### श्रीमद् देवी भागवत सप्ताहाचे मनोभावे दर्शन

**विवरा – मार्गशीर्ष महिन्यात धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व असते. त्यानिमित्त विवरा गावात श्रीमद् देवी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.**

१४ डिसेंबर रोजी या सप्ताहाची सांगता झाली. या प्रसंगी श्रीमद भागवत सप्ताहाचे डॉ. केतकीताई पाटील यांनी मनोभावे दर्शन घेतले तसेच भाविकांशी संवाद साधला. यावेळी आमदार अमोल दादा जावळे यांच्यासोबत ए जे महाजन यांच्या निवासस्थानी भेट दिली. याप्रसंगी श्रीमद देवी भागवतकार सौ. असोदेकर ह्या देखील उपस्थित होत्या, त्यांच्याशी संवाद साधून देवी भागवताबद्दल माहिती जाणून घेतली. तसेच महाजन कुटुंबियांसोबत चर्चा केली.

### गुरुवर्य संत श्रीजगन्नाथजी महाराज यांचा २३ व्या पुण्यतिथीमहोत्सव

**फैजपूर – येथील सतपंथ मंदिर संस्थांचे अकरावे ब्रह्मलीन गादीपती गुरुवर्य संत श्री जगन्नाथ जी महाराज यांच्या २३ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त १३ व १४ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यानिमित्त आज शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी कार्यक्रम स्थळी उपस्थित राहिले.**

याप्रसंगी व्यासपीठावर परमपूज्य महामंडलेश्वर श्री जनार्दन हरी जी महाराज, परमपूज्य श्रद्धेय संतश्रीगोपालचैतन्यमहाराज, सावदा येथील दत्त मंदिरातील परमपूज्य श्रद्धेय महंत श्री आचार्य मानेकर बाबा शास्त्री, शिंदखेडा येथील परमपूज्य श्रद्धेय योगी दत्त नाथजी महाराज, मुक्ताईनगर येथील आदिशक्ती मुक्ताबाई संस्थानचे परमपूज्य श्रुती ह भ प रविंद्र महाराज हरणे, भुसावळ येथील दजेश्वरी काली मंदिरातील परमपूज्य श्रद्धे गेंदालालजी महाराज, परमपूज्य श्रद्धेय ह भ प धनराज जी महाराज अंजाळेकर, जामनेर येथील गुरुदेव सेवा आश्रमातील परमपूज्य श्री श्याम चैतन्य जी महाराज, आचार्य डॉ सचिन जी पाटील, सावदा येथील स्वामीनारायण मंदिरातील परमपूज्य शास्त्री आनंद प्रकाशदासजी महाराज, फैजपूर येथील ब्रह्मकुमारी शकुंतला दीदी, खंडोबा वाडी येथील परमपूज्य महंत श्री पवन महाराज, ह भ प प्रविण दास जी महाराज, दिपकजी भगत, हभप रविंद्र महाराज महाले, फुलंब्री, हभप नितीनजी महाराज, हभप संतोष महाराज, मनोज महाराज, दत्तात्रय महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील समस्त ह भ प श्रद्धेय महाराज मंडळी व टाळकरी मंडळी उपस्थित होते. तसेच भाजपा प्रदेश महिला मोर्चा उपाध्यक्षा डॉ. केतकीताई पाटील, आमदार अमोल भाऊ जावळे, विनोद भाऊ सोनवणे, चंदन कोल्हे, नरेंद्र नारखेडे उपस्थित होते.

### स्वामीनारायण मंदिर, जळगाव

**जळगाव वडताल संस्थेअंतर्गत जळगाव येथे श्री स्वामीनारायण मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. १० ते १७ डिसेंबर दरम्यान ह्या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम सुरु आहे.११ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० वाजेपासून अखंड धून सुरु झाली तसेच महाविष्णू याग देखील करण्यात आला. या प्रसंगी शास्त्री हरी प्रकाश स्वामी यांनी श्रीमद भागवत कथा आपल्या अमृत वाणीद्वारे सांगितली.**

या वेळी गोदावरी फौंडेशन चे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ उल्हास पाटील हे उपस्थित होते. आयोजकांद्वारे आशीर्वाद म्हणून डॉ उल्हास पाटील यांना फेटा बांधण्यात आला तसेच भगवान श्री स्वामीनारायण व श्री लक्ष्मीनारायण देव यांची प्रतिमा भेट दिली. यावेळी स्वामींनी सांगितले की, मनाचे शुद्धी ही फक्त श्रीमद् भागवत कथाच करू शकते, त्यामुळे भागवत कथा श्रवण करणारे तुम्ही सर्व पुण्यवान आहेत. कार्यक्रमाच्या अखेरीस गीतेच्या अध्याचे पठण होऊन महाआरती करण्यात आली. या प्रसंगी पूज्य पी पी स्वामी महाराज, पूज्य गोविंद स्वामी महाराज, आमदार राजुमामा भोळे, श्री सुनील खडके, हभप जळकेकर महाराज, महामंडलेश्वर जनार्दन हरी महाराज, पाल येथील गोपाळ चैतन्य महाराज, खंडोबा वाडीचे पवनकुमार दास महाराज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन नयनस्वामी यांनी केले. या प्रसंगी जळगाव जिल्ह्यातील विविध पंथातील तसेच संपूर्ण देशभरातून स्वामीनारायण पंथातील संत महंत तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रीडास्पर्धेत गोदावरीच्या खेळाडूंचे यश

### आंतर महाविद्यालयीन खोखो स्पर्धा (महिला)

**जळगाव – डॉ बाबासाहेब अंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अंतर्गत जळगांव विभाग आंतर महाविद्यालयीन खोखो क्रीडा स्पर्धा आर सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपुर येथे नुक़्ताच संपन्न झाले.**

जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक मधून संघ सहभागी झाले. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पुरुष संघाने उपविजेतेपद पटकवले.गोदावरी फ़ाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, डॉ केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, यांनी खो खो खेळाडुनांचे अभिनंदन केले. क्रीड़ा संचालक प्रा. डॉ. आसिफ़ खान यांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडुंना लाभले.

### आंतर महाविद्यालयीन खोखो स्पर्धा (पुरुष)

**जळगाव – डॉ बाबासाहेब अंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अंतर्गत जळगांव विभाग आंतर महाविद्यालयीन खोखो क्रीडा स्पर्धा आर सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपुर येथे नुक़्ताच संपन्न झाले.**

जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक मधून संघ सहभागी झाले. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे महिला संघाने खो खो च्या अंतिम सामन्यात एस. एस. बी. टी. फार्मसी महाविद्यालय बांभोरी ला १०-६ ने पराभूत केले.गोदावरी फ़ाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, डॉ केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, यांनी खो खो खेळाडुनांचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. आसिफ़ खान यांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडुंना लाभले.

### विद्यापीठ हॉकी स्पर्धेत दोन खेळाडू

**जळगांव– डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या हॉकी संघ पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी जयपुर (राजस्थान) येथे सहभागी झाला आहे.**

या संघात ज़ळगाव येथिल गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयचे २ खेळाडु सहभागी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या हॉकी संघात गोदावरिचे आवेस खान व जैनुद्दीन देशमुख यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.होते. संघाने ३ सामन्यात विजयी झाले.हॉकी संघाचे चांगले प्रदर्शन झाले या साठी बाटू विद्यापीठचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे, (मुख्य क्रीड़ा समन्वयक) प्रा. एस. जी. कराड प्रा. बालाजी पुलचवाड (समनवयक), श्री.एस. डी. पाटील ( सहसमन्वयक), गोदावरी फ़ाउंड़ेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, डॉ केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, श्री रणजीत इंगोले यांनी हॉकी खेळाडुनांचे अभिनंदन केले. हॉकी संघ प्रशिक्षक म्हणून क्रीड़ा संचालक प्रा. डॉ. आसिफ़ खान यांनी काम पहिले.

### आंतर महाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धा

डॉ बाबासाहेब अंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अंतर्गत जळगांव विभाग आंतर महाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धा आर सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपुर येथे नुक़्ताच संपन्न झाले.जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक मधून वेग वेग्ड्या महाविद्यालयाचे संघ सहभागी झाले. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे महिला संघाने कबड्डी च्या अंतिम सामन्यात एस. एस. बी. टी. फार्मसी महाविद्यालय बांभोरी ला १४-५ ने पराभूत केले.गोदावरी फ़ाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, डॉ केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, यांनी कबड्डी खेळाडुनांचे अभिनंदन केले. क्रीड़ा संचालक प्रा. डॉ. आसिफ़ खान यांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडुंना लाभले.











जळगाव – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन मुंबई यांच्या मान्यतेने जळगाव जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित पद्मश्री डॉ भवरलाल जैन यांच्या संजीवनी दिनानिमित्त ज्युनिअर गर्ल्स आंतर जिल्हा फूटबॉल स्पर्धा २०२४ चे पारितोषिक वितरण.

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## स्वास्थ व परिवार कल्याण केंद्रसरकार सहा.संचालक

# डॉ.गिरी यांची डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयास भेट

**जळगाव – केंद्र सरकारच्या स्वास्थ व परीवार कल्याण सहा संचालक डॉ.विवेकानंद गिरी यांनी कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमातर्गत डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचेसोबत जळगाव जिल्हा जि.प.कुष्ठरोग विभाग सहायक संचालक डॉ. जयवंत मोरे, वैद्यकिय अधिकारी डीएनटी डॉ इरफान तडवी हे देखिल उपस्थित होते.**

प्रारंभी डॉ. गिरी आणि टीमचे स्वागत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ प्रशांत सोळंके डॉ. दिलीप ढेकळे,डॉ निलेश बेंडाळे यांनी केले. या भेटीत डॉ. गीरी यांनी कुष्ठरोग रूग्णांवर उपचार करणा या त्वचारोग विभागाच्या कार्याची माहिती देखिल करून घेतली. तसेच त्वचारोग विभागाचे प्रमुख डॉ पंकज तळेले व निवासी वैद्यकिय अधिका यांना चर्चासत्रातून मार्गदर्शन करतांना जिल्हयाच्या आदीवासी बहुल भागातून आजही कुष्ठरोग रूग्णांचे निदान होत असून त्यांचेवर त्वरीत निदान व उपचाराची दिशा तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीवर प्रतिबंधनात्मक उपचाराची दिशा



याबददल मार्गदर्शन करतांना आपली राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण योजना ही आधुनिक उपचारांमुळे अत्यंत यशस्वी झाली आहे. गेल्या दशकात कुष्ठरोगाचे प्रमाण कमी झाले आहे. कुष्ठरोग नियंत्रण योजना चालविणारे पॅरेमेडिक कर्मचारी आणि रिफॅम्पिसीन औषधाचे संशोधक यांना हे श्रेय जाते. ज्यांना अगदी एखादाच चट्टा आहे अशांनाही मल्टी ड्रग थेरेपी करण्यात येतो. बहुधा तरुणपणात किंवा मध्यमवयातच या रोगाची चिन्हे दिसतात. ज्यांना कुष्ठरोगाविरुध्द चांगली प्रतिकारशक्ती असते त्यांना सहसा हा आजार होत नाही. यावर आता प्रभावी औषधे निघाल्याने बहुतेकांचा आजार सहा महिने ते दीड वर्ष या काळात पूर्ण बरा होतो. त्यासाठी कायमचे नुकसान होण्याआधीच या रोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखून उपचार व्हायला पाहिजेत. असे सांगितले यावेळी अधिष्टाता डॉ.प्रशांत सोळंके, जनऔषध वैद्यकशास्त्राचे डॉ. दिलीप ढेकळे,डॉ निलेश बेंडाळे यांनी देखिल मार्गदर्शन केले.

## जिल्ह्यातून तीन आमदारांनी घेतली मंत्री पदाची शपथ

### पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी फुगड्या खेळून, जिलेबी वाटून केला जल्लोष

**जळगाव – महाराष्ट्र राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आज रविवार १५ डिसेंबर रोजी सायंकाळी नागपूर येथील राजभवनामध्ये संपन्न झाला.**

महायुती सरकारमध्ये एकूण ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यात जळगाव जिल्ह्यातून तीन आमदारांना मंत्रिमंडळाची संधी मिळाली असून या क्षणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी हा शपथविधी सोहळा जळगाव येथील जीएम फाउंडेशन कार्यालयात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी लाईव्ह बघितला. यावेळी ना. गिरीश भाऊ महाजन, ना. गुलाबराव पाटील, ना. संजय भाऊ सावकारे यांनी शपथ घेतल्यावर कार्यालयामध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. केतकीताई यांनी महिलांनी फुगड्या खेळून तसेच महिलांसह पुरुषांनी जिलेबी तयार करून आनंद व्यक्त केला. यावेळी माजी खासदार डॉ उल्हास पाटील,



ज्ञानेश्वर जळकेकर महाराज, सीमा ताई भोळे, उज्वलाताई बेंडाळे, अरविंद दादा देशमुख, रेखाताई वर्मा, भारती ताई सोनवणे, सुनील दादा खडके यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गोदावरी नर्सिंग महाविद्यालयास भेट

जळगाव जळगाव जिल्हयात नुकतेच सूरू झालेले गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सारोदे आयुर्वेदिक महा-विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथे शैक्षणिक व आंतरविषय अभ्यासासाठी भेट दिली.

या भेटीचा उद्देश आयुर्वेद व आधुनिक नर्सिंग या दोन क्षेत्रांतील सुसंवाद वाढवून आरोग्यसेवेचे व्यापक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना समजावून देणे हा होता. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना नर्सिंग महाविद्यालयाच्या सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली, ज्यामध्ये सिम्युलेशन लॅब, ग्रंथालय, व वर्गखोल्यांचा समावेश होता.

दोन्ही महाविद्यालयांच्या शिक्षकांनी आयुर्वेद व आधुनिक नर्सिंग पद्धतींतील



एकत्रित उपयोग व तंत्र यावर चर्चा केली. विद्यार्थ्यांसाठी नर्सिंग शिक्षण आणि रुग्णांच्या संपूर्ण देखभालीत त्याच्या महत्त्वावर एक छोटेखानी सत्र आयोजित करण्यात आले. हा उपक्रम परस्पर शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरला व भविष्यात अशा भेटीतून सामूहिक उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## मानव अधिकार दिनानिमित्त तर्सोद येथे जनजागृती रॅली




जळगाव, ११ डिसेंबर २०२४: गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभागातर्फे तरसोद (जळगाव) येथे मानव अधिकार दिनानिमित्त जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीद्वारे नागरिकांच्या अधिकारांबाबत जनजागृती करण्यात आली.

मानवाचे मूलभूत हक्क, सन्मान आणि सामाजिक न्याय याविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी विद्यार्थ्यांनी तर्सोद परिसरात फलक, घोषवाक्ये आणि संदेशांच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत महत्त्वपूर्ण माहिती पोहोचवली. रॅलीत १०० हून अधिक छडड स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या उपक्रमाच्या माध्यमातून तर्सोदमधील नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून देण्यात आली आणि समाजामध्ये समानता आणि न्यायाचे महत्त्व पटवून दिले.

गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विशाखा गणवीर, छडड समन्वयक प्रा. निम्मी वर्गीस, प्रा. आश्लेषा मून, प्रा. रितेश पडघन व प्राध्यापक मंडळींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, मानव अधिकार दिनानिमित्त अशी जनजागृती रॅली समाजाला सकारात्मक बदल घडवण्यासाठी महत्त्वाची ठरेल. या कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या एएनएम द्वितीय वर्षाचा उत्कृष्ट निकाल

**जळगाव – गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या एएनएम (ऑक्सिलरी नर्सिंग मिडवायफरी) द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी २०२३-२४या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांनी १००% निकालाची परंपरा राखत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची उंची कायम ठेवली आहे.**

यात प्रथम क्रमांक सपकाळे दिव्या ८०.१६%, द्वितीय क्रमांक जीवतोळे विना ७८.३३%, तृतीय क्रमांक हुसले अंजली ७७.८३%, चतुर्थ क्रमांक बाविस्कर प्रतिभा ७७.६६%पाचवा क्रमांक सिकल्गर मिसबहुल्न

संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. प्राचार्य विशाखा गणवीर, प्रशासकीय अधिकारी प्रवीण कोल्हे व सर्व शिक्षक वृंद यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

‘* Decisively lead from the front by setting clear goals and expectations.
* Make bold decisions that can be risky and keep composed when uncertainty strikes.
* Learn swiftly, adjust to change and work with ambiguity.
* Be prepared to face current challenges and equipped to harness future opportunities.
* Leverage short-term opportunities as circumstances demand it and craft new strategies accordingly.
* Implement established and tested procedures while simultaneously

* स्पष्ट लक्ष्य और अपेक्षाएं निर्धारित करके सामने से निर्णायक रूप से नेतृत्व करें।
* साहसिक निर्णय लें जो जोखिम भरे हो सकते हैं और जब अनिश्चितता आती है तो शांत रहें।
* तेजी से सीखें, बदलाव के अनुकूल हों और अस्पष्टता के साथ काम करें।
* वर्तमान चुनौतियों का सामना करने के लिए तैयार रहें और भविष्य के अवसरों का लाभ उठाने के लिए सुसज्जित रहें।
* परिस्थितियों की मांग के अनुसार अल्पकालिक अवसरों का लाभ उठाएं और तदनुसार नई रणनीतियां तैयार करें।
* स्थापित और परीक्षण की गई प्रक्रियाओं को लागू करते हुए, साथ ही नए प्रयोग के लिए खुले रहें।
* समस्या-समाधान क्षमता बढ़ाएं और चुनौतियों को नेविगेट करने की संभावनाओं में सुधार करें।

## भाविकांची आरोग्य तपासणी व रक्तदान

**जळगाव – जळगाव – भुसावळ रोडवरील दूरदर्शन टॉवरच्या शेजारी वडताल संस्थेच्या अंतर्गत भगवान स्वामीनारायण मंदिराची उभारणी करण्यात आलेली आहे. या मंदिरात भव्य मूर्तीची प्राणप्रतिष्ठा स्थापन करण्यासाठी या परिसरात १० ते १३ डिसेंबरच्या दरम्यान भव्य प्राणप्रतिष्ठान महोत्सव संपन्न झाला. यात २५० च्या वर भाविकांनी रक्तदान केले.**




या ठिकाणी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महा.व रूग्णालयातर्फे भाविकांना आरोग्य तपासणी व रक्तदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

प्रर्दशानाच्या प्रवेशव्दारावरच डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाचे तज्ञ तसेच रक्तपेढीचे समन्वयक हे मार्गदर्शन करत होते या प्रदर्शनास भेट देणा-या ४०० हुन अधिक नागरिकांनी व संतानी, भावजकांनी आरोग्य तपासणी व १५० रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आले व पुढील होणा-या कार्यक्रम संकल्प करून पुण्यकाम करावे असे आवाहन जय श्री. स्वामीनारायण मंदिर, जळगांव व गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील धर्मदाय रूग्णालय व रक्तपेढी प्रशासनाने केले आहे.

